# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक ३४ वा ❑ गुरूवार दि.०६ मार्च २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)

## विशेष लेख...

## जगभरातील ४०% विद्यार्थी मातृभाषेपासून वंचित

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

संयुक्त राष्ट्रांच्या शैक्षणिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक संघटनेच्या (युनेस्को) अलिकडच्या अहवालात असे दिसून आले आहे की जगातील ४०% लोकसंख्येला ते बोलू शकतील किंवा समजू शकतील अशा भाषेत शिक्षण मिळत नाही. काही कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्ये हा आकडा ९०% पर्यंत पोहोचतो, ज्यामुळे २५ कोटींहून अधिक विद्यार्थी प्रभावित होतात.

ही समस्या शिक्षणाच्या गुणवत्तेवर आणि शिकण्याच्या क्षमतेवर देखील परिणाम करत आहे, कारण जेव्हा विद्यार्थी त्यांच्या स्वतःच्या भाषेत अभ्यास करू शकत नाहीत तेव्हा त्यांना विषय खोलवर समजत नाही आणि त्यांची शैक्षणिक प्रगती खुंटते.

स्थलांतरित आणि अल्पसंख्याक समुदाय अधिक त्रासलेले आहेत.

अनेक देशांमध्ये, शिक्षणाची भाषा ही अधिकृत भाषेसारखीच असते, परंतु अनेक लोकांना ही भाषा कशी बोलावी किंवा समजावी हे माहित नसते. यामुळे त्यांना चांगल्या शिक्षणापासून वंचित राहावे लागते. विशेषतः स्थलांतरित आणि अल्पसंख्याक समुदायातील मुलांसाठी ही समस्या आणखी गंभीर बनते.

जेव्हा मुलांना त्यांच्या सभोवतालची भाषा समजत नाही, तेव्हा त्यांना शिक्षण व्यवस्थेपासून वेगळे वाटू लागते, ज्यामुळे त्यांच्या आत्मविश्वासावर आणि शैक्षणिक कामगिरीवर नकारात्मक परिणाम होतो. याशिवाय, अनेक देशांमध्ये शिक्षकांना मातृभाषेत शिकवता येत नाही, ज्यामुळे समस्या आणखी गुंतागुंतीची होते.

**भारतातील परिस्थिती कशी आहे?**

भारतातही भाषेवरील चर्चा सुरू आहे. सरकारने राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० लागू केले आहे, जे मातृभाषेतून शिक्षणाला प्रोत्साहन देण्यावर भर देते. या धोरणाचा मुख्य उद्देश प्राथमिक वर्गात मातृभाषेला प्राधान्य देणे आहे जेणेकरून मुलांना चांगले समजेल आणि शिकण्याची प्रक्रिया सोपी होईल. तथापि, शाळांमध्ये लागू केलेल्या त्रिभाषिक धोरणाबाबत काही राज्यांमध्ये मतभेद दिसून आले आहेत. अनेक राज्यांमध्ये मातृभाषेऐवजी इंग्रजी किंवा हिंदीमध्ये शिक्षण दिले जाते, ज्यामुळे मुलांना ते समजणे कठीण होते.

**यावर उपाय काय असू शकतो?**

युनेस्कोने काही महत्त्वाच्या सूचना दिल्या आहेत ज्या या समस्येचे निराकरण करू शकतात: मातृभाषेतील शिक्षणाला प्राधान्य दिले पाहिजे जेणेकरून मुले त्यांच्या सुरुवातीच्या काळात चांगले शिकू शकतील. शिक्षकांना बहुभाषिक शिक्षणाचे प्रशिक्षण दिले पाहिजे जेणेकरून ते वेगवेगळ्या भाषांमध्ये शिकवू शकतील.

विद्यार्थ्यांना त्यांच्या भाषेत दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी भाषा-विशिष्ट अभ्यासक्रम आणि आशय विकसित केला पाहिजे. बहुभाषिक शिक्षण धोरण लागू केले पाहिजे जेणेकरून सर्व विद्यार्थ्यांना समान संधी मिळतील आणि भाषेच्या अडथळ्यामुळे कोणीही शिक्षणापासून वंचित राहणार नाही. मातृभाषेत शिक्षण घेतल्याने मुलांची समज आणि बौद्धिक विकास सुधारतो याची जाणीव पालकांना करून दिली पाहिजे.

भाषा ही शिक्षणाचा एक महत्त्वाचा पैलू आहे आणि ती कोणत्याही विद्यार्थ्यासाठी शिकण्याची प्रक्रिया सोपी करते. जर एखाद्या मुलाने त्याच्या मातृभाषेत अभ्यास केला तर तो लवकर शिकतो आणि विषय अधिक खोलवर समजतो. अनेक देशांनी ही समस्या ओळखली आहे, परंतु ती पूर्णपणे अंमलात आणण्यात अजूनही अनेक आव्हाने आहेत.

# जनसंवादामुळे समाजात एकत्वाची भावना दृढ होते

**संमेलनाध्यक्ष प्रो. डॉ. गजानन देवकर यांचे प्रतिपादन; पाचव्या जनसंवाद ग्रामीण साहित्य संमेलनास ग्रंथदिंडीने झाला प्रारंभ!**

**ज्योतिर्मय साहित्य**

**नांदेड** – जनसंवाद होणे काळाची गरज आहे. धावपळीच्या काळात जनसंवाद तुटत चालण्याची खंत अनेक साहित्यिकांनी आणि विचारवंतांनी व्यक्त केलेली आहे. संवादाच्या माध्यमातून समाजाला स्थैर्य देण्याचे कार्य अविरत ठेवणे गरजेचे आहे. संवाद हा संवादच असावा. संवादातून विसंवाद झालेल्या अनेक घटना आपण बघत आहोत. समाजाच्या विकासाखाली समाजाच्याच अधोगतीचे दर्शन घडत आहे. शासन स्तरावरून अनेक महत्त्वपूर्ण बदल होत आहेत. रस्ते विकासाची गती जशी मोठी आहे तशीच ग्रामीण भागातील शिक्षणाची गती असणे आवश्यक आहे. दर्जेदार शिक्षणाच्या माध्यमातूनही जनसंवाद होणे आवश्यक आहे. जनसंवादासाठी समाजाला प्रत्येकाने जोडून घेतले पाहिजे. जनसंवादामुळे समाजात एकत्वाची भावना दृढ होते, असे प्रतिपादन येथील कै. बाबासाहेब गोरठेकर महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख प्रो. डॉ. गजानन देवकर यांनी केले. ते भोकर तालुक्यातील मातुळ येथे भरलेल्या पाचव्या राज्यस्तरीय जनसंवाद ग्रामीण साहित्य संमेलनाच्या उद्घाटन सत्रात अध्यक्षपदावरुन बोलत होते.



यावेळी नांदेड लोकसभा खासदार प्रतिनिधी अजित चव्हाण, संमेलनाध्यक्ष सुप्रसिद्ध साहित्यिक प्रो. डॉ. गजानन देवकर, ज्येष्ठ साहित्यिक देविदास फुलारी, कृषी उत्पन्न बाजार समिती उमरीचे सभापती शिरिषभाऊ गोरठेकर, माजी जिल्हा परिषद सदस्य माधवराव पाटील मातुळकर, ज्येष्ठ कथाकार दिगांबर कदम, कथाकार स्वाती कान्हेगांवकर, स्वच्छतादूत राजीव तिडके, सरपंच प्रतिनिधी प्रकाश कदम, उपसरपंच माधव बोईनवाड, पो.पा. लक्ष्मण बोईनवाड, चेअरमन मधुसूदन पवार, तंटामुक्ती अध्यक्ष नामदेव कदम, स्वागताध्यक्ष सतीश मातुळकर, निमंत्रक बालाजी सूर्यतळे, मुख्य संयोजक दत्ताहरी कदम, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष तुकाराम डांगे, माजी निमंत्रक प्रल्हाद हिंगोले, मुदखेडचे माजी गटशिक्षणाधिकारी दिलिप सुपे, शिक्षण विस्तार अधिकारी प्रतिनिधी आनंदा वाघमारे, जिपहाचे मुख्याध्यापक पी. एस. मिस्त्री, गंगाधर जक्कलवाड, श्यामसुंदर बोईनवाड, मारुती भोकरे, सप्तरंगी साहित्य मंडळाचे संस्थापक अध्यक्ष अनुरत्न वाघमारे, राज्याध्यक्ष नागोराव डोंगरे यांची उपस्थिती होती.

रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीच्या निमित्ताने भोकर तालुक्यातील मातुळ येथे सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा समिती व सप्तरंगी साहित्य मंडळ, महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने विठ्ठल रुक्मिणी मंदिरात येथील सप्तरंगी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचलित साहित्य मंडळाच्या पाचव्या जनसंवाद ग्रामीण साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. दिवसभरात ग्रंथदिंडी, पुरस्कार वितरण, परिसंवाद, प्रकाशने, कथाकथन, गझलसंध्या, कविसंमेलन, ठरावाचन अशा विविध सत्रांतून साहित्य संमेलन उत्साहात संपन्न झाले. ग्रंथदिंडीने संमेलनास प्रारंभ झाला. यात गावकऱ्यांसह जिपहा मातुळचे विद्यार्थी, शिक्षक, शिक्षिका आणि भजनी मंडळ सहभागी झाले होते. उद्घाटन सत्राच्या सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतिबा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर, साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमास प्रारंभ झाला. यावेळी मान्यवरांच्या सत्कारानंतर कवी जी. एस. भालेराव यांच्या काव्यानंद या काव्यसंग्रहाचे प्रकाशन व समाजसाधना या साहित्य संमेलन विशेषांकाचे प्रकाशन झाले. खा. रविंद्र चव्हाण आणि आ. श्रीजया चव्हाण यांचा शुभेच्छा संदेश वाचून दाखविण्यात आला. तसेच मान्यवरांची यथोचित भाषणे झाली. उद्घाटन सत्रातच विविध क्षेत्रातील कार्यरत मान्यवरांना जनसंवाद विशेष पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यात जितेंद्र देशमुख, शिरीष लोणकर, सुभाष गड्डम, संगिता नेत्रगावे, नागोराव लोखंडे, प्रा. ओमपप्रकाश मस्के, गंगाधर मिसाळे यांचा समावेश होता. उद्घाटन सत्राचे प्रास्ताविक रणजित गोणारकर यांनी केले. सूत्रसंचालन कैलास धुतराज यांनी तर आभार नागोराव डोंगरे यांनी मानले. संमेलनाच्या यशस्वीतेसाठी सप्तरंगी साहित्य मंडळाचे पदाधिकारी आणि सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा समिती मातुळ पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# राज्यस्तरीय फॅशन डिझाईन स्पर्धा उत्साहात, विक्रमशीला कॉलेजचा स्तुत्य उपक्रम

**ज्योतिर्मय साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर** – विक्रमशीला कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, छत्रपती संभाजीनगरच्या वतीने दिनांक २ मार्च २०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर येथील वाणी कम्युनिटी हॉल, शिवाजीनगर येथे राज्यस्तरीय ड्रेस डिझायनिंग स्पर्धे चे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत राज्यातील अनेक महाविद्यालय आणि बुटिकमधील विद्यार्थी आणि डिझायनर यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. चित्ररेखा सिरसे (वरिष्ठ सामाजिक कार्यकर्त्या) होत्या, तर उद्घाटन डॉ. अशोक गावित्रे (चित्रपट निर्माता, दिग्दर्शक व अभिनेते) यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुणे म्हणून पंचशीला सुधाकर बनाटे (अनंतपाल बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, छ. संभाजीनगर) आणि दीपा प्रदीप रोडे (अध्यक्ष, तुलसी महिला मंडळ, बीड) उपस्थित होत्या. तसेच, प्राचार्य अर्चना साळवे (विक्रमशीला कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन) यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला. परीक्षक म्हणून मा. डॉ. प्रवीण पवहारे (सहाय्यक प्राध्यापक) यांनी भूमिका बजावली.

स्पर्धेत बीड, धाराशिव, छत्रपती संभाजीनगर, यवतमाळ, जळगाव, अहमदनगर, नाशिक, नांदेड या जिल्ह्यांतील ७० विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवला. कार्यक्रमात विद्यार्थिनींनी व डिझायनरांनी तयार केलेले ड्रेस मॉडेल्सनी परिधान करून सादर केले. स्पर्धेत फर्स्ट राऊंड, सेमीफायनल आणि फायनल असे तीन राऊंड पार पडले.

स्पर्धेतील विजेते: प्रथम: रुचीरा वाडकर (इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ फूड सायन्स अँड टेक्नॉलॉजी) रोख रू.१०,०००, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र, द्वितीय : आजिरा फातेमा (सानिका कॉलेज) रोख रू.७,०००, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र, तृतीय: खुशी मोरे (विक्रमशीला कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन) रोख रू.५,०००, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र

स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थिनींना सहभाग प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक स्वप्नाली सुतार, संध्या बागूल, निशा कांबळे, संजना खरात, प्रज्ञा खरात, ज्योती मोरे, संतोष प्रधान, सुमित भराडे, वैशाली पाटेकर, दिगंबर जाधव, खंदारे यांच्यासह विद्यार्थिनींनी मोलाचे योगदान दिले.




## लक्षवेधी छायाचित्र....



मिल्की वे, ताम्हिणी घाट , महाराष्ट्र

(छाया : संजय दारमवार, मुंबई)





प्रत्येक जणांच्या आयुष्यात काही गमतीदार किस्से घडतातच काही आयुष्यभर आठवणीत राहतात. असे काही किस्से आम्ही शेअर करू इच्छितो आमच्या गमतीदार किस्से या सदरातून. मग वाट कसली बघता घ्या पेन आणि लिहायला सुरु करा आणि पाठवा मला ७७४३९१८५५९ या व्हाट्सअप नंबरवर.

**शब्दमर्यादा १५० शब्दापर्यंत.**

आम्ही पोहोचवितो ते किस्से लाखों लोकांपर्यंत ज्योतिर्मय-साहित्याचे विद्यापीठ च्या माध्यमातून आणि तुमचा फोटो सोबत पाठवा.

**संजय व्यापारी**
संपादक, ज्योतिर्मय
७७४३९१८५५९



सस्नेह निमंत्रण

गांधी विचार साहित्य संमेलन २०२५ — गांधी भवन, कोथरुड, पुणे

**महाराष्ट्र गांधी स्मारक निधी**
आयोजित

**गांधी विचार साहित्य संमेलन २०२५**



| संमेलनाध्यक्ष | उद्घाटन हस्ते | समारोप हस्ते |
|---|---|---|
| सुरेश द्वादशीवार | मनोज कुमार झा | सोनम वांगचुक |
| लेखक, ज्येष्ठ संपादक | राज्यसभा खासदार | पर्यावरण विशेषज्ञ, वैज्ञानिक |

तारीख : ७ ते ९ मार्च २०२५
ठिकाण : गांधी भवन प्रांगण, कोथरुड, पुणे





– विद्यावाचस्पती विद्यानंद
Mobile: +917709612655
Email: vidyavachaspati.vidyanand@gmail.com

आनंदी पहाट...

## कुटुंबाला विभक्त होण्यापासून वाचवावे

ज्योतिर्मय साहित्य

व्यक्तिमत्त्व, क्षमता, कौशल्य आणि वागणूक यातील फरक आपल्याला स्पष्टपणे सांगू शकतो, की वेगवेगळे लोक समान स्थितीत का वेगवेगळी भूमिका बजावतात. आपल्या परस्परांतील नातेसंबंधांना टिकवणे हे आपल्याच हातात असते. आपल्या वेगवेगळ्या भूमिकांमुळे प्रत्येकाच्या व्यक्तीमत्वात जरी बदल होत असला, तरीही त्याचा संबंध केवळ व्यावहारिकदृष्ट्या महत्वाचा असल्याचे समजून नाते टिकविण्याचे कौशल्य आत्मसात करण्याइतपत आपण निश्चितच निपुण आणि सुजाण आहोत. नाते संबंध टिकवणे हीच खरी मोठी संपत्ती ठरू शकते. त्यासाठी बांधिलकीची भावना आपल्यांत रुजणे अधिक गरजेचे असते.

करिअर, कौटुंबिक जबाबदाऱ्या, नोकरी, व्यवसाय, शिक्षण आणि प्राप्त परिस्थिती अशा अनेक कारणांमुळे दिवसेंदिवस व्यक्ती विघटन वाढत चालल्याचे दिसून येत आहे. पूर्वीची एकत्र कुटुंब पद्धती तर सर्वत्र पाहायला मिळणे आता दुरापास्त होत चालले आहे. विभक्त कुटुंब व्यवस्था देखील फार काळ बघायला मिळाली नाही; कारण त्यानंतर व्यक्ती विघटन त्वरेने घडायला लागले. ह्या व्यक्ती विघटनामुळे माणूस केवळ शरीराने वेगळे राहायला लागला असे नाही, तर तो मानसिक पातळीवर देखील स्वतंत्र आयुष्य जगू लागला. खरे तर, बांधिलकीची भावना त्यामुळेच संपुष्टात येत चालली. तन, मन आणि धन हे स्वतःच्या कुटुंबासाठी जोपर्यंत वापरले जाते; तोपर्यंत आपापल्या कौटुंबिक, जबाबदाऱ्या, कर्तव्य आणि मर्यादा जपल्या जातात. पण कुटुंबाची चौकट जेव्हा तुटते,तेव्हा त्याचे वेटोळे नाही तर वाटोळे व्हायला सुरुवात होते.एक प्रकारे आपल्या सामाजिक बांधिलकीमुळेच कुटुंबाची, नवीन नात्यांची निर्मिती होत असते. त्या दृष्टीकोनातून सामाजिक बांधिलकीचे महत्व आपल्या स्वतःसाठी आणि कुटुंबासाठी समजून घेणे जरुरीचे असते. त्यासाठी सामाजिक बांधिलकीचे भान राखणे आवश्यक असते.

## पुलंचे एक अप्रतिम व्यक्तीचित्र – विनोद दा

ज्योतिर्मय साहित्य




'' अंधारातच दार उघडले गेले. हा चित्रकार अंधारात का बसला होता ते मला कळेना. तेवढ्यात एक मोलकरीण आली आणि तिने बटण ओढून दिवा लावला. काळोखातल्या रंगमंचावर प्रकाश पडावा आणि एकदम अनपेक्षित अशा प्रकारच्या देखाव्याने चकित व्हावे तसे मला झाले. एका ईझीचेअरवर काळा चष्मा घालून एक अतिशय सौम्यदर्शन वृद्ध गृहस्थ बसले होते. बराच वेळ ते तिथे बसलेले असावेत. समोर एक लहानशी तिपाई होती. तिच्यावर वीत सव्वावीत उंचीची एक मातीची मूर्ती घडत होती. बाजूला मातीचा गोळा होता. त्यामुळे अंधारातच ही शिल्पकलेची आराधना चाललेली असावी. भिंतीवर नाना प्रकारची चित्रे होती. आणि फडताळ पुस्तकांनी भरलेले होते...''

हे गृहस्थ म्हणजेच सुंदर म्युरल्स तयार करणारे सुंदर चित्रे काढणारे विनोद दा. त्यांनी सलील आणि पुलंची चौकशी केली. त्यांच्याबद्दल बोलताना पुढे पुलं लिहितात...



'' मी त्याच्याकडे पाहण्यातच गर्क होतो. किती विलक्षण प्रसन्न व्यक्तिमत्व ! बोलणं तर खडीसाखरेसारखं. तपः पूत चेहरा. डोक्यावर पांढरे शुभ्र केस, सडसडीत देहयष्टी. अंगात शुभ्र कुडता, पायजमा. दोन–चार मिनिटातच मला त्यांच्या अंधत्वाचा विसर पडला. मी सहज त्यांनी केलेल्या म्युरल्सविषयी बोलणे काढले.

विनोद दा म्हणाले, खूप वर्षे झाली त्या म्युरल्सला. त्यावेळी थोडे थोडे दिसत असे मला. मग मला कळले की चित्रकलेचे वेड आणि डोळ्यांचे अधूपण घेऊनच विनोद दांनी जगात प्रवेश केला. कागदाच्या अगदी जवळ डोळे नेल्याशिवाय त्यांना दिसत नव्हते. त्याकाळी कुठलीही चित्रशाळा त्यांना प्रवेश देत नव्हती. तसल्या त्या अधूदृष्टीच्या बालचित्रकाराला सरकारी चित्र शाळेचे दरवाजे बंद होते. ''

येथे गुरुदेव रवींद्रनाथ टागोरांची महानता आणि द्रष्टेपण आपल्याला कळते. '' गुरुदेवांनी या मुलाची प्रतिभा पाहिली आणि त्याला जवळ घेतले. चित्रशाळा फक्त नियम जाणत होत्या. टागोरांना या मुलाच्या अधू डोळ्यातले तेज दिसत होते. त्यांनी त्याला रंग आणून दिले, कुंचले दिले आणि सांगितले, काढ तुला हवी तेवढी चित्रे. गुरुदेवांचा आधार लाभला नसता तर कुठली चित्रे काढणार होतो मी...! असे भावपूर्ण उद्गार विनोद दांनी काढले. ''

त्यांच्याबद्दल बोलताना पुढे पुलं लिहितात,'' सत्तरीच्या घरातल्या वृद्धाकडून ते वाक्य ऐकताना काळजाचे पाणी झाले. सहा चौरस इंचाहून एका दमात अधिक पृष्ठभाग दिसू न शकणारे विनोद दा. त्यांनी मुकाबला घेतला तो विस्तीर्ण भिंतीशी त्या विस्ताराच्या इंचा इंचात डोळा घालून त्यांनी भव्य म्युरल्स उभे केले. सलीलच्या वडिलांनीच त्यांना लहानपणी गुरुदेवांपुढे आणल्यामुळे घोष कुटुंबावर त्यांचा विशेष लोभ. अनेक गोष्टी सांगत होते. मात्र गोष्टीवेल्हाळपणा नव्हता. बोलणे ही लोभस असून रेखीव. विनोद दा म्हणजे शांतिनिकेतनातल्या गेल्या ३०/४० वर्षातल्या कलासाधनेचा चालता बोलता इतिहास आहे. केवळ चित्रकलाच नव्हे तर महाभारत, रामायण या महाकाव्यांचा त्यांनी खूप बारकाईने अभ्यास केला आहे. शांतिनिकेतनातल्या त्यांच्या सहकाऱ्यांच्या आणि विद्यार्थ्यांच्या आठवणी ऐकताना वाटत होते की केवळ कुंचल्यानेच नव्हे तर लेखणीने देखील हा माणूस काय सुरेख व्यक्तिचित्रे काढू शकला असता !''

(क्रमशः)



दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## सत्वगुण लक्षण (समास सातवा)

ज्योतिर्मय साहित्य

परमार्थाचे सौदर्य आहे, महात्म्य चे भुषण आहे. रज, तम गुणांचे निरसन होते. अत्यंत सुख देणारा परमानंदाचा अनुभव देऊन तो जन्ममरणाचे निवारण करतो. अज्ञानाचा नाश करतो. सत्वगुण देहात प्रगट झाला तर ईश्वरावर प्रेम,विवेक,परमार्थाची आवड, हरिकथेची गोडी, दुःखाचा विसर पडून भक्तीमार्गाच्या वाटेने जाताना भजन पुजन किर्तन करून जो परमार्थ ची आवड ऊत्तन्न करून आत्मत्त्वाची गोडी निर्माण करतो. जो नियमित स्नानसंध्यादी कर्मे करून पुण्यकर्मे सहज रितीने करतो अंतरंग व बाह्यांग ही ज्याचे पवित्र आहे तो स्त्वगुण.

यजन म्हणजे स्वतः यज्ञ करणे, याजन म्हणजे दुसऱ्या कडून यज्ञ करवून घेणे अध्यापन करणे, दानधर्मादी पुण्यकर्मे करणे परमार्थ व तत्त्वज्ञान वेदांत ऐकण्याची आवड भगवंताच्या सगुण चरित्राची गोडी श्रवण केलेल्या ऊपदेशानुसार आपल्या वागण्या बोलण्यात आचरणात आण्याची शक्ती म्हणजे सत्वगुण होय. सत्वगुणी अनेक प्रकारचे दान करतो मंदिरात गरजूंना दान करतो जो देवाधर्माच्या सेवेत झिजून आयुष्य सार्थकी करतो. गायी, घोडे, भूमी, धनद्रव्ये दान करतो. अन्न वस्त्र, पाणी दान करतो. तीर्थक्षेत्री जाऊन नाना प्रकारचे दान करतो, गरिबांना ईनाम म्हणून जमीनी देतो, तळी विहिरी बांधतो, देवळे बांधतो धर्मशाळा बांधतो तुळशी लावतो. नदी, तलावाला भाविकांच्या सोयी साठी पायर्या बांधतो,पिंपळाचे पार बांधतो, गाईगुरांच्या साठी चारा छावण्या काढतो. देवालयाच्या साठी लहान मोठ्या बागा काढतो. ज्ञानी व तपस्वी लोकांच्या मनास शांती देतो.जो गरजूंना लक्ष भोजने घालतो. धान्य सुरक्षित रहावे म्हणून कोठारे बांधतो. भारत संस्कृती प्रधान देश आहे. लाखो हजारो वर्षांपासून ईथे मंदिराची कमी नाही. हजारो वर्षांपासून ची मंदिरे सुरक्षित आहेत. हा अनमोल ठेवा सत्वगुणी माणसांनीच जतन केलाआहे. अनेक परकीय आक्रमणांच्या तावडीतून सोडवला आहे. हाच तो सत्वगुण होय. आपल्या परंपरा पाळणे,मंदिराची डागडुजी करणे कथा किर्तने नैवेद्य करणे, रांगोळ्या काढणे,झांज,चिपळ्या अब्दागिरी पताका निशाणे,दिंड्या काढणे. यात्रा जत्रा काढणे. देवाला दागदागिन्यांनी मढवणे, देवाला फळ ,फुल तुळशीपत्र वहाणे. ही सर्व पुण्यकर्मे करणे म्हणजे सत्वगुण होय.

(क्रमशः)



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

## नामाने सद्बुद्धी उत्पन्न होते.

ज्योतिर्मय साहित्य

कौरवांनी पांडवांना निदान पाच गावे तरी द्यावीत, म्हणजे युद्धाचा प्रसंग टळेल, म्हणून भगवान् श्रीकृष्ण स्वतः दुर्योधनाकडे शिष्टाई करण्याकरिता गेले. त्यावेळी दुर्योधनाने सांगितले की, 'देवा, तू म्हणतोस ते सर्व बरोबर आहे. न्यायाच्या दृष्टीने तू म्हणतोस तसे काहीतरी करणे जरूर आहे. पण तसे करण्याची मला बुद्धीच होत नाही, त्याला मी काय करू ? तू सर्वसत्ताधीश आहेस, तर मग माझी बुद्धीच पालट म्हणजे सर्वच प्रश्न एकदम मिटेल !' परंतु तसे काही न होता पुढे युद्ध झाले हे प्रसिद्धच आहे. तीच स्थिती रावणाच्या बाबतीतही दिसते. म्हणून, सगुणरूपी अवताराने वासना किंवा बुद्धी पालटण्याचे कार्य होऊ शकत नाही असे दिसते. सद्बुद्धी उत्पन्न करण्याचे सामर्थ्य फक्त भगवंताच्या नामातच आहे. म्हणूनच त्रिकालाबाधित असणाऱ्या नामावताराची आता जरुरी आहे. नाम म्हणजे भगवंतच आहे. ते नाम अनन्य होऊन आपण घेऊ या.

एका माणसाची प्रकृती बरी होती पण त्याच्या पायामध्ये काहीतरी दोष उत्पन्न झाला. डॉक्टर म्हणाला की, ''जीव वाचवायचा असेल, बाकीचे सर्व शरीर टिकवायचे असेल, तर पाय कापायला हवा.'' आता, नुसता प्राण आहे पण हात हलत नाही, पाय हलत नाही, डोळ्यांनी दिसत नाही, कानांनी ऐकू येत नाही, पण प्राण आहे, तर उपयोग नाही. याउलट, बाकी सगळे आहे पण प्राण नाही, तरीही उपयोग नाही. प्राण आहे पण बाकीच्या गोष्टींपैकी एखादी नसली तर चालू शकेल. समजा, कानाने ऐकू येत नाही; नाही तर नाही ! कुठे बिघडले ? उपासना, अनुसंधान, हे प्राणासारखे समजावे; बाकी व्याप आहे तो शरीराच्या इंद्रियांप्रमाणे समजावा. यात भगवंताचे अनुसंधान चुकले तर प्राणच गमावल्यासारखे आहे; ते सांभाळून जे करता येईल तेवढेच करणे जरूर आहे. ते न सांभाळता बाकीच्या गोष्टी केल्या तर अंती निराशा आहे.

आमच्या मनासारख्या गोष्टी होत नाहीत म्हणून आम्ही दुःखी आहोत असे म्हणण्यापेक्षा, ती गोष्ट आमच्या मनात आहे हेच दुःखमूळ आहे. अमकी गोष्ट सुखदायक आहे ही जी कल्पना आहे, तीच दुःखमूळ आहे, हे समजून आपण वागले पाहिजे. मांजर उंदराशी खेळते; ते त्याला धरील, परत सोडील, पुनः धरील, पुनः सोडील, पण शेवटी प्राण घेईलच त्याचा. तसे काळ आपल्याशी करतो आहे; आशेत गुंतवून ठेवील, पुढे जाईल. आपण पहिल्यापासूनच हे ओळखून राहावे की असे गुंतून राहण्यात काही फायदा नाही, आणि अनुसंधान ठेवले तरच मनुष्याचे कल्याण होईल. नाही तर फार कठीण आहे. मी–मी म्हणणारे, दुसऱ्याला ज्ञान सांगणारे, विद्वान्, शास्त्री, पंडित सर्व खरे भ्रमातच आहेत. म्हणून म्हणतो, एक करा – अनुसंधान टिकवून जेवढे करता येईल तेवढेच करा.

३३. आपल्या इच्छेनुसार गोष्टी घडत नाहीत ही भगवंताची कृपाच आहे.




## मंत्र आनंदाचा

ज्योतिर्मय साहित्य

मित्र हो नमस्कार

आपल्या जीवनात सर्वत्र आनंद भरलेला आहे. पण हा पावला–पावलावर पसरलेला आनंद आपल्या शोधणे जमत नाहीये, माझ्या मते याचे कारण ''आपण आजच्या वर्तमानात गोंधळलेल्या मनाने जगत आहोत''.

त्यामुळे आपल्याला आणि दिसत ही नाही म्हणून तो शोधता येत नाही.

हातचं सोडून पळत्याच्या मागे धावत गेलं की ''मग आपल्या हाती काहीच लागत नसते'', वर्तमानातील पिढीला हे जेव्हा समजू लागेल, त्या दिवसापासून या मंडळींना रोजच्या जगण्यातला आनंद आपल्याला सहजेतेने मिळवता येईल असे मी सांगेन.

आजच्या चाळीशीत असलेल्या माझ्या तमाम मित्र–मैत्रिणींना, आज मी आमच्या चाळिशीच्या काळातील म्हणजे १९९० च्या दशकातील आमच्या पिढीने कशा कशात आनंद अनुभवला ते सांगू इच्छितो–

मुंबई, पुणे आणि मोठ्या शहरातली गोष्ट सोडून देऊ या, कारण त्याकाळी बहुसंख्य लोक लहान शहरात असायचे.

आम्ही राहायचो ते शहर परभणी जिल्हा ठिकाण होते, पण ते आधुनिक वाटणारे शहर नव्हते.

लहान–मोठ्या इतर ठिकाणी तीस–पस्तीस वर्षांपुर्वीची जीवन–शैली, जीवनमान साधे सरळ होते.

टीव्ही घरोघरी येण्याची सुरुवात होती, सिरियल्सचे मायाजाल अजून म्हणावे तितके पसरले नव्हते.

थोडक्यात घरोघरी एकमेकांना भेटणे, गप्पा–टप्पा या गोष्टी करण्याइतका निवांतपणा माणसांना मिळत होता.

गृहिणींना पाहुणचार करण्यासाठी किचनमध्ये जाण्यासाठी मुबलक वेळ होता.

त्यामुळे घरी आलेल्या पाहुण्यांसोबत, परिवारसहित आलेल्या मित्र–मंडळींसोबत गप्पा व्हायच्या सोबत भरपेट खाऊनच जो तो आपल्या घरी परतायचा.

एकेमेकांकडे फॅमिलीसाहित जायचे हा नियम आम्ही कसोशीने पाळत असू त्यामुळे किमान पंचवीस–तीस परिवार आम्ही एकमेकांशी घट्ट मैत्री नात्याने जोडले गेलो.

कुणाच्याही घरी कार्य असू द्या, आम्ही सारे त्या घरातले घरची माणसे म्हणून हक्काने, आपलेपणाने कार्यात सहभागी असायचो.

लहान–मोठे सगळेच एकमेकांशी परिचित असल्याने कुणालाही संकोच वगैरे असे वाटत नसे.

महिला मंडळ एकजुटीने एकदिलाने किचन सांभाळीत की जेव्हा सगळे मिळून जेवणास बसायचे, त्या सहभोजनाचा स्वाद अवीट गोडीचा आणि आनंद अमीट असे.

मित्र हो आमचे हे ऋणानुबंध आजही टिकून आहेत.

तसे तर आमच्यातले कुणी श्रीमंत नव्हते, सगळे नोकरी करणारे, जवळपास सारखा पगार असणारे आणि कुटुंब–वत्सल गृहस्स्थ होते. कदाचित या समान धाग्यामुळे आमची मने जुळून आली. आमच्यातले संवाद कधी विसंवाद नाही झाले.

अडीअडचणीला आपणच एकमेकांचे घरचे आहोत, नातेवाईक आहोत हा भावनिक आधार आमच्यासाठी मोठ्या आनंदाचा होता.

''दाल रोटी खाओ, प्रभू के गुण गाओ'' हा आमचा आनंद–मंत्र '' आजही आमच्या मनात आहे.



नीतिशतक निरूपण

अनुवाद आणि निरूपण
ह.भ.प.चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

**सन्त्यन्येऽपि बृहस्पतिप्रभृतयः सम्भाविताः पञ्चषाः**
**तान् प्रत्येष विशेषविक्रमरुची राहुर्न वैरायते ।**
**द्वावेव ग्रसते दिवाकरनिशाप्राणेश्वरौ भास्वरौ**
**भ्रातः पर्वणि पश्य दानवपतिः शीर्षावशेषाकृतिः ।।**

अर्थ – हे बन्धो, आकाशात बृहस्पतीसारखे पाच सहा ग्रह भ्रमण करतात. पण विशेष पराक्रमाची आवड असणारा राहू त्यांच्याशी वैरभाव ठेवत नाही. ज्याचे केवळ शीरच शिल्लक आहे, असा हा दानवराज दोनही तेजस्वी म्हणजे चंद्र किंवा सूर्य यांनाच पर्वकाळी ग्रासतो.

हा श्लोक अन्योक्तीसारखा आहे. एक पराक्रमी व्यक्ती दुस–या पराक्रमी व्यक्तीसोबतच स्पर्धा करते. पराक्रमी व्यक्ती उगाच कोणालाही आव्हान देत नाही; तर पराक्रमात आपल्याशी तुल्यबळ असेल, त्यासच आव्हान देते. असा भाव येथे कवीश्रेष्ठ भर्तृहरींनी व्यक्त केला आहे.

## आचरणात आणावे असे



ज्योतिर्मय साहित्य

विसर्जन तलावावर रिमझिम पावसात एक आजी आजोबा दिसले. आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्यांच्या सोबत आणखी कोणी नव्हते. तिथला एक कार्यकर्ता ते बघून चटकन पुढे झाला आजोबांच्या हातात असलेल्या पाटावरच्या गणपतीला बाजूला ठेवलेल्या टेबलावर ठेवण्यासाठी.

आजींनी त्या मुलाला थांबवले. अरे त्यांना एकट्याला करून दे. सगळं हौसेने करायला आवडत त्यांना. आजोबांनी हातातल्या बाप्पाला अलगदपणे टेबलावर ठेवले आणि ते आजींना म्हणाले, आरतीचे ताम्हन तयार कर आणि झांजा काढ. आजींनी पिशवीतून ताम्हन आणि थोडंसं तूप घालून आणलेलं निरांजन आणि उदबत्ती असं सगळं बाहेर काढलं. निरांजन लावून ताम्हन आजोबांच्या हातात दिलं. आजोबांनी आरती म्हणायला सुरुवात केली आणि आजींनी झांज वाजवायला. एव्हाना तिथे आलेले काही भाविक कौतुकाने पुढे येऊन आरती मध्ये सहभागी झाले. दोन चार आरत्या म्हणून आजोबा थांबले. बाप्पाच्या पाटावर डोकं टेकवताना आजोबांचे डोळे पाणावले. आजींनी तबक आणि बाकी साहित्य परत पिशवीत ठेवलं. तो तेवढा मोबाईल काढ बर पिशवीतून आणि ह्यांना दे बाप्पा सोबत आपला फोटो काढायला. आजोबा आजीला म्हणाले. आजींनी तो मोबाईल माझ्या हातात दिला. मी फोटो काढून आजोबांना दाखवला. आजोबा खुष झाले. तुम्हाला शक्य असेल तर विसर्जन करतानाचा छोटासा व्हिडिओ काढाल का? आजोबांनी मला विचारले. का नाही आजोबा. काढतो मी व्हिडिओ. मी म्हणालो. आजोबांच्या चेहरा उजळला.




## रिफाईड ऑइल खायला हानिकारक

ज्योतिर्मय साहित्य

मग कुठलं तेल खाण्यात वापरायचे आणि तेच का खायचं ?

कोल्ड कम्प्रेस् ऑइल म्हणजेच लाकडी घाण्याचे तेल. जुन्या पद्धतीत तेल काढण्याची पद्धत म्हणजे लकडी घान्यावरील तेल

लाकडी घाण्याच्या शुद्ध तेलाचे फायदे!

१. लाकडी घाण्याचे शुद्ध तेल कोणत्याही प्रकारचे केमिकल्स न वापरता पूर्णपणे नैसर्गिक आणि शास्त्रोक्त पद्धतीने तयार केले जाते .

२. शुद्ध तेलाचा सुगंध येतो कारण त्यात चार ते पाच प्रकारचे प्रोटिन्स असतात . तो सुगंध त्या प्रोटिन्सचाच असतो .

३. शुद्ध तेलाला चिकटपणा खूप असतो कारण त्यामध्ये आपल्या शरीराला आवश्यक असणारे फॅटी ऍसिड असतात व व्हिटॅमिन इ आणि मिनरल्स सुद्धा असतात .

४. लाकडी घाण्यावरचे तेल सर्वोत्तम असते कारण हे तेल काढताना लाकडी घाणा असल्यामुळे शेंगदाण्यावर जास्त दाब दिला जात नाही . शिवाय हा घाणा एक मिनिटात फक्त १४ वेळाच फिरतो . थोडक्यात या लाकडी घाण्याचा १४ असतो . त्यामुळे लाकडी घाण्याचे तेल काढताना एकही नैसर्गिक घटक नष्ट होत नाही .

५. शरीराला अत्यंत आवश्यक असलेला घटक हायडेन्सिटी लिपोप्रोटीन हा आपल्या लिव्हरमध्ये तयार होतो मात्र तो शुद्ध तेल खाल्ल्यामुळे तयार होतो . म्हणूनच आहारात शुद्ध तेल आवश्यक असावे .

६. शुद्ध तेल खाल्ल्याने वात दोष संतुलित राहतो त्यामुळे वाताच्या प्रकोपाने होणारे आजार होत नाही .

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

७. हार्ट अटॅक, किडनीचे आजार, कॅन्सर, डायबेटिज, सांधेदुखी, पॅरालिसिस,ब्रेन डॅमेज यांसारख्या गंभीर आजारांवर शुद्ध तेल गुणकारी आहे .

८. भारतात शेकडो वर्षांपासून लाकडी घाण्याचे तेल आहारात असल्याने आपले पूर्वज दीर्घायुषी होते . १०० वर्षांच्या व्यक्तीला सुद्धा गंभीर आजार नव्हते.

९. लाकडी घाण्यावर तेल तयार करताना तेलाचे तापमान ४० ते ४५ सेल्सिअसपेक्षा जास्त नसते त्यामुळे तेलातील कोणताही नैसर्गिक घटक नष्ट होत नाही . हे सर्व घटक आपल्या शरीरासाठी महत्वाचे असतात.

१०. चांगल्या आरोग्यासाठी आवश्यक असणारे, आपल्याला अनेक आजारांपासून दूर ठेवणारे लाकडी घाण्याचेच शुद्ध तेल खावे . तसंच एक मोठा गैरसमज आपल्या सगळ्यांमध्ये आहे की, शेंगदाण्याच्या तेलाने कोलेस्ट्रॉल वाढते हे चुकीचे आहे . उलट शेंगदाण्याच्या तेलामुळे . . . वाढते आणि हेच ... आपल्या शरीरात अत्यंत आवश्यक असते .

## रवींद्रनाथ टागोर




विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

### रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

रवींद्रनाथांचे थोरले बंधू ज्योतिरिंद्रनाथ यांच्या पत्नी कादंबरीदेवी यांनी रवींद्रनाथांवर खूप माया केली. आईचे प्रेम त्यांना दिले. पण मुख्य म्हणजे त्यांना तिने लिहिण्याची प्रेरणा दिली. लिहिते केले. जे लिहिले त्याला उत्तेजन दिले आणि त्यांच्या लेखनात काही चुका असल्या तर त्याही हसत खेळत लक्षात आणून दिल्या. दुर्दैवाने त्यांची ही आईसमान प्रेम करणारी वहिनी काही कारणाने लवकर गेली. पण तिचे प्रेम रवींद्रनाथ कधीही विसरू शकले नाहीत. त्यांनी आपला शैशव कविता हा काव्य संग्रह वहिनीला अर्पण केला.

सुरुवातीला रवींद्रनाथांनी त्या काळातील प्रख्यात कवींच्या कवितांच्या शैलीचे अनुकरण केले. त्यामध्ये बिहारीलाल चक्रवर्ती, भानू सिंह ठाकूर आदींच्या कवितेचा समावेश होता. पण लवकरच त्यांनी ही अनुकरण शैली सोडून स्वतःची शैली विकसित केली. त्यात ते लिहू लागले. अनुकरणातून मनुष्य फार प्रगती करू शकत नाही. रवींद्रनाथांना स्वतःची शैली गवसली, आपल्या आतील आवाज त्यांनी ऐकला. त्यांची हीच गोष्ट त्यांना महाकवी बनण्यासाठी उपयोगी पडली. आपल्या स्वतंत्र लेखन शैलीने ते एवढे मोठे झाले की आज त्या काळातील इतर साहित्यिकांची नावे वाचकांना फारशी आठवणार नाहीत पण प. बंगालमधील साहित्यिक म्हटले की रवींद्रनाथांचे नाव ठळकपणे नजरेसमोर येते.

रवींद्रनाथांनी वयाच्या अवघ्या २० व्या वर्षी लिहिलेले वाल्मिकी प्रतिभा हे नाटक आजच्या परिस्थितीतही अत्यंत वास्तवदर्शी आहे हे आपण मागच्या भागात पाहिले. रवींद्रनाथ या काळात एक कवी आणि लेखक म्हणून प्रसिद्धीला आले होते परंतु आपल्या सुरुवातीच्या काळातच त्यांना त्या काळातील प्रथितयश साहित्यिकांची टीका देखील सहन करावी लागली होती असे आपल्याला आढळून येते. पण साहित्यिकांची ही टीका टिप्पणी रवींद्रनाथांनी अतिशय धीराने आणि शांतपणे सहन केले यात त्यांचे मोठेपण दिसून येते. त्या टीकाकारांमध्ये त्यांच्यातील लेखकाचे किंवा कवीचे असलेले मोठेपण मान्य करण्याइतका मनाचा मोठेपणा नव्हता असेही म्हणता येईल. परंतु रवींद्रनाथांनी त्यांना कधीच कमी लेखले नाही आणि त्यांच्या टीकेची पर्वाही केली नाही किंवा त्यांच्यावर प्रतिहल्ला केला नाही. त्यांच्या टीकेला शांतपणे तोंड दिले एवढेच नाही तर त्यांनी अशा या साहित्यिकांना त्या बदल्यात उदार मनाने शुभेच्छाही दिल्या.

तत्कालीन साहित्यिकांनी त्यांच्यावर टीका करण्याचे एक कारण असेही सांगता येईल की रवींद्रनाथांची लेखनशैली ही पारंपारिक नव्हती. ते आपल्याला जे वाटेल ते मुक्तपणे आपल्या भाषेत आणि आपल्या लेखन शैलीचा वापर करून ते लिहीत होते. त्यामुळेच तत्कालीन वाचकांना आणि साहित्यिकांना त्यांची शैली अंगवळणी पडण्यास काही काळ जावा लागला.

प्रसिद्ध कवी वड्र्सवर्थ याला देखील आपल्या सुरुवातीच्या काळात अनेक टीकाकारांची टीका सहन करावी लागली होती. त्या काळातील प्रख्यात कवी ड्रायडन, पोप यांच्याप्रमाणे भडक आणि कृत्रिम लेखन शैलीचा अवलंब त्याने केला नव्हता. आणि वाचकांना त्यांच्याच लेखनशैलीची सवय झाली होती. परंतु पुढे काळाच्या ओघात वड्र्सस्वर्थच्या लेखनातील सच्चेपणा, साधेपणा वाचकांना भावला. आणि तो एक प्रथितयश कवी म्हणून प्रसिद्धीला आला.

# रवींद्र नाट्यमंदिरात सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात




**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**मुंबई –** सांस्कृतिक कार्य विभाग आणि पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या वतीने ३ आणि ४ मार्च रोजी विविध सांस्कृतिक कार्यक्रम पार पडले. नूतनीकृत अकादमीमध्ये नाट्य, नृत्य आणि संगीताच्या विविध कार्यक्रमांचे सादरीकरण करण्यात आले.

रवींद्र नाट्यमंदिर येथे आयोजित या विशेष महोत्सवासंदर्भात पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या संचालक मीनल जोगळेकर म्हणाल्या की, पारंपरिक आणि शास्त्रीय संगीताच्या माध्यमातून महिलांच्या कलाविष्काराला वाव देण्यात आला आहे. कला अकादमीच्या या नव्या पर्वात अशा अनेक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून, त्याला रसिक प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. त्याचबरोबर महिलांच्या कलासामर्थ्याचा हा उत्सव पुढील काही दिवस रंगत जाणार असून, यामध्ये नृत्य, नाटक, गायन आदी विविध कलारूपांचे सादरीकरण होणार असल्याचे जोगळेकर यांनी सांगितले.

३ मार्च २०२५ रोजी पार्थ थिएटर्स, मुंबई यांच्यातर्फे पु. ल. देशपांडे लिखित ‘मॅड सखाराम’ या नाटकाचा प्रयोग सादर करण्यात आला. त्यानंतर, ‘व्यक्ती आणि वल्ली’मधील काही व्यक्तिरेखांवर आधारित अनुवादित बंगाली नाट्यविष्कार ‘आमार देखा किचू नमुना’ हे रूपांगण फाउंडेशन, मुंबई यांच्यातर्फे सादर करण्यात आले. या नाटकाचे दिग्दर्शन शिवाजी सेनगुप्ता यांनी केले होते, तर नाट्य रूपांतर आणि अनुवाद देवांशू सेनगुप्ता यांचा होता.

४ मार्च २०२५ रोजी महिला कला महोत्सवात रेश्मा मुसळे परितेकर, योगिता मुसळे, अश्विनी मुसळे आणि त्यांच्या संचाने लावणी नृत्य सादर केली. या कार्यक्रमाला आशाताई मुसळे आणि सुलोचना जावळकर यांच्या गायनाने रंगत आणली, तर कृष्णा मुसळे (ढोलकी), विठ्ठल कुडाळकर (तबला) आणि सुधीर जावळकर (हार्मोनियम) यांनी संगत दिली. त्यानंतर, विदुषी अपूर्वा गोखले आणि विदुषी पल्लवी जोशी यांच्या शास्त्रीय युगलगायनाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. अनंत जोशी (पेटी) आणि अभय दातार (तबला) यांनी त्यांना साथ दिली.

यावेळी आपली भावना व्यक्त करताना लावणी नृत्यांगना श्रीमती रेश्मा मुसळे म्हणाल्या की, लोककलेला आणि लोककलावंतांना रसिकांकडून मिळणारी दाद ही नक्कीच सुखावणारी आणि लाखमोलाची असते.

रवींद्र नाट्यमंदिर, प्रभादेवी येथे २ मार्च ते १५ मार्च २०२५ या कालावधीत महाराष्ट्रातील नामांकित चित्रकार, सुलेखनकार आणि शिल्पकार यांच्या कलाकृतींचे प्रदर्शन भरवण्यात आले आहे. सकाळी ११ ते सायंकाळी ७ या वेळेत हे प्रदर्शन खुले असणार असून, मुंबईकरांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे आणि पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या संचालक मीनल जोगळेकर यांनी केले आहे.

***

# भाषा अन संस्कृतीने जगायला शिकवावे, प्राचार्य सुनीलकुमार लवटे यांचे प्रतिपादन



**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर –** जगातले बहुतेक देश भाषेवर तयार झालेले आहेत. माणसांनी भाषा अभिमानाने जगवली पाहिजे, वाढवली पाहिजे, शब्द संपदेवर ज्या समाजाची हुकूमत असते त्या समाजाचा कणा ताठ असतो. भाषा माणसाला क्रियापदच नव्हे तर क्रियाशील बनवते. भाषा आणि संस्कृतीने माणसाला जगायल शिकवले पाहिजे, असे प्रतिपादन प्राचार्य सुनील कुमार लवटे यांनी केले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील हिंदी विभाग व विद्यार्थी कल्याण विभागाच्यावतीने ३ ते ५ मार्च दरम्यान तीन दिवशीय व्याख्यामालेचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये मंगळवारी (दि.४) वा.ल.कुलकर्णी व्याख्यानमालेत प्राचार्य सुनीलकुमार लवटे 'भाषा, साहित्य आणि संस्कृती' या विषयावर आपले विचार मांडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठी विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ.प्रल्हाद लुलेकर होते. यावेळी विभागप्रमुख डॉ.संजय राठोड, समन्वयक डॉ. सुधाकर शेंडगे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी अध्यक्षीय समारोप करताना डॉ. प्रल्हाद लुलेकर यांनी भाषा माणसाला घडवते आणि माणूस भाषेला घडवतो, काळानुसार भाषा व संस्कृती बदलत असते. भाषा आणि संस्कृती संवर्धनाची जबाबदारी जशी समाजाची आहे तशीच अभ्यासकांची देखील आहे. विद्यार्थ्यांनी देखील भाषा आणि संस्कृतीचा अभ्यास केला पाहिजे असे सांगितले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात डॉ.सुशाकर शेंडगे यांनी प्रा.वा.ल.कुलकर्णी व्याख्यानमाले विषयी आपली भूमिका मांडली. विभागप्रमुख डॉ.संजय राठोड यांनी स्वागतपर मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.दैवत सावंत यांनी केले तर प्रा.सरला दवंडे यांनी आभार मानले. कार्यक्रमाला माजी हिंदी विभागप्रमुख डॉ.चंद्रदेव कवडे, डॉ.दासू वैद्य, डॉ.आदिनाथ सोनटक्के, डॉ. नवनाथ गोरे यांच्यासह विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.




# लेखणी माझी देखणी – एक स्तुत्य उपक्रम

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा गावंदरा येथे अक्षर आनंद वाचन संस्कार केंद्र, गावंदरा तालुका धारूर अंतर्गत ‘‘ लेखणी माझी देखणी ‘‘ हा उपक्रम घेण्यात आला. या उपक्रमा अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी अनेक स्पर्धा घेण्यात आल्या व विद्यार्थ्यांना पारितोषिक देण्यात आले तेही विद्यार्थ्यांच्या हस्ते. कार्यक्रमही विद्यार्थ्यांनी सादर केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धनश्री मच्छिंद्र केकाण हिने केले. इयत्ता पहिली आणि इयत्ता पाचवी या दोन वर्गात ही स्पर्धा घेण्यात आली. त्या स्पर्धेचे परीक्षक आदरणीय विजयकुमार सिताप सर हे होते.

अक्षर आनंद वाचन संस्कार केंद्र गावंदरा येथे सर्व शिक्षक नेहमी काही ना काही उपक्रम सतत घेत असतात.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा गावंदरा तालुका.धारूर, जिल्हा.बीड येथे हे कार्यक्रम पर पडले.

लेखणी माझी देखणी – हस्ताक्षर स्पर्धा सन २०२५

यामध्ये प्रथम क्रमांक अरमान मुस्तफा शेख इयत्ता पाचवी,या बालवाचकाचे बक्षीस वितरण अमीर अल्लाउद्दीन शेख या बालवचकाने केले.

द्वितीय क्रमांक बळीराम बालासाहेब घुले इयत्ता. पाचवी या बालवाचकाचेबक्षीस वितरण श्याम महादेव बडे या बालवाचकाने केले.

तृतीय क्रमांक जनाबाई कृष्णा घुले इयत्ता पाचवी या बालवाचकाचे बक्षीस वितरण धनश्री मच्छिंद्र केकाण या बालवाचकाने केले

पहिलीतील विद्यार्थ्यांमध्ये प्रथम क्रमांक जान्हवी दत्ता बडे या बालवाचकाचे बक्षीस वितरण प्रीतम सुभाष तिडके या बालवाचकाने केले.

द्वितीय क्रमांक रागिणी रमेश बडे या बालवाचकाचे बक्षीस वितरण तन्वी चंद्रकांत बडे या बालवाचकाने केले. तृतीय क्रमांक रितेश राजेभाऊ घुले या बालवाचकाचे बक्षीस वितरण संजय सुभाष भांगे या बालवाचकाने केले.



सौ.जयश्री अर्जुन मुंडे
अंबाजोगाई

मार्गदर्शन सौ. जयश्री अर्जुन मुंडे यांनी केले. हा बक्षीस वितरण कार्यक्रम आनंदात पार पडला. भावी पिढी प्रगल्भ, समृद्ध आणि समजुतदार बनावी यासाठी सतत वाचन घेतले जाते. लेखन समृद्ध व्हावे . बालवाचकांच्या अभिव्यक्तिला स्थान मिळावे यासाठी कविता लेखन, पत्र लेखन असे अनेक उपक्रम घेण्यात येतात. अशा उपक्रमांनी विद्यार्थ्यांच्या अध्ययनात गोडी निर्माण होते तसेच नाविण्यपूर्ण उपक्रमामुळे त्यांच्या अंगी अनेक क्षमता विकसित होतात. मुलांच्या अभिव्यक्तिला पंख फुटतात. त्यांच्या सृजनशीलतेला, कल्पना शक्तीला वाव मिळतो. त्यातून मिळणारा आनंद हा निर्मळ आणि अनमोल असतो. नवनिर्मितीचा आनंद हा अतुलनीय आहे.



देखणे ते हात ज्यांना, निर्मितीचे डोहळे
मांगल्यने गांधाळले, सुंदराचे सोहळे

# आज समाजात महिला सुरक्षित नाहीच !



**ज्योतिर्मय साहित्य**

जागतिक महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा ! भारत हा पुरुष प्रधान देश असला तरी स्त्री शक्तीचा आदर करणारा देश आहे. आज जगातील प्रत्येक महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून सर्व जबाबदाऱ्या स्विकारणारी एक अनुभूत शक्ती आहे. असे म्हटले तरी अतिशीक्ती होणार नाही. `` महिला ही अशी शक्ती, ताकद आणि स्फूर्ती आहे. की कुणाही कमजोर व्यक्तीला सांभाळून घेणारी माता आणि भगिनी आहे.`` कारण कुटुंबाची सर्वात जास्त काळजी घेणारी व्यक्ती म्हणजे स्त्री होय. जेव्हा कधी एखादी स्त्री आजारी पडते ना.. तेव्हा तिचं पहीलं टेन्शन तिचं स्वत:चं आजारपण नसतं तर तिच्या कुटुंबियांच्या जेवणाचं असतं. अशी काळजी करणारी महिला नसेल तर कुटुंबाची वाताहात होते. कारण आपल्या चिंताग्रस्त पतीला, मुलाला कोणत्याही प्रसंगाच्या वेळी नेहमी खंबीरपणे सांगते मी आहेना तु घाबरु नकोस. या शब्दात एवढी ताकद आहे की कमजोर व्यक्तीला कोणतेही आव्हान उचलण्यासाठी एक प्रकारची स्फूर्ती देणारी ही कुटुंबातील माता किवा भगिनी होय. आपण अनेक घरात वरील वाक्य नेहमीच उच्चारले जाते.

आजच्या डिजिटल युगात महिला सर्वच क्षेत्रात अग्रेसर आहे. याची जाणीव ठेऊन केंद्र सरकारने महिलांना आरक्षण देणारे विधेयक मंजुर करुन तमाम स्त्रीवर्गाला बहुमान दिलेला आहे. या आरक्षणा बरोबर समाजात सन्माननिय वागणूक मिळाली तरी पुरेशे आहे. काळजी घे हा शब्द काळजातून निघतो. आपल्या परक्यांची जाण करुन देतो. कोणीतरी आहे आपल्यासाठी झुंजणारं, कोणीतरी आहे आपल्यासाठी रडणारं या भावनांनी घरातील कर्त्या पुरुषाचा जीव सुखावतो. काळजी घे या शब्दातच आपलेपणा दरवळतो. आणि हे शब्द असतात ते घरातील माता - बहिणीचे. ज्या वेळी घरातील मुले किवा कर्ता घराबाहेर जातो तेव्हा मायेने बोलणारी ही घरातील कर्ती स्त्री असते. त्यामुळे घरातील कर्त्या व्यक्तीला वेगळी उर्जा मिळते. त्यामुळे ती व्यक्ती सफलते कडे प्रवास करते. ती लहान मुलांना घडवणारी एक अदभूत शक्ती असते. नम्रता हा गुण सर्व गुणांपेक्षा जास्त किंमती व मौलवान आहे. तो ज्याच्याकडे आहे त्याच्या भोवती कितीही बलाढ्य स्पर्धक असले तरी ती आयुष्यात नक्कीच यशस्वी होतो. कारण व्यवहार हा घरातील शुभकलश आहे, इंसानियत घरातील तिजोरी आहे, मधुर वाणी घरातील धन दौलत आहे, शांती घरातील महालक्ष्मी आहे, पैसा हा घरातील क्षणीक पाहूणा आहे, एकता घरातील ममता आहे, व्यवस्था घरातील शोभा आहे आणि समाधान हे घरातील खरे सुख आहे. हे सर्व टिकवण्यासाठी घरातील स्त्रीला मुक्तता हवी. तसे पाहिले तर हे सर्व गुण घरातील स्त्रीकडे असतातच असतात. त्यांच्यामुळेच आपण सुखी व समाधानी आहोत.



दत्ताराम दळवी
लालबाग
९८२०५२७८५५

महिलांवर आजही दिवसा ढवळ्या अत्याचार होत आहेत. ते थांबले पाहीजे. त्यासाठी सरकारने आरक्षणा बरोबर त्यांना सुरक्षितता द्यायला हवी. तरच आजची स्त्री ताठ मानेने कुठेही आणि कधीही फिरु शकेल. आज घरातील स्त्री किंवा मुलगी बाहेर गेली तर ती घरात येई पर्यंत घरातील इतर व्यक्तींच्या जीवात जीव नसतो. कारण ती आज खरोखरच सुरक्षीत आहे का ? असा प्रश्न सर्वानाच पडलेला आहे. म्हणून आरक्षणाबरोबर महिलांना समाजात स्वैर आणि स्वच्छंदी जगण्याचा सुरक्षीत मुलभूत हक्क प्रथम द्यायला हवा. स्त्रीला आरक्षण देवून देवी बनवून बंदिस्त करण्यापेक्षा तिच्या पंखाना बळ देवून तिला मुक्त विहार करु द्या. हीच या जागतिक महिला दिनाची फार मोठी भेट महिलांना दिली पाहीजे. महिलांना चार वेदांचे अर्थ नाही समजले तरी चालेल पण समजदारी, जबाबदारी, वफादारी आणि इमानदारी या चार शब्दांचे मर्म समजले तरी आपले जीवन सार्थकी लागेल असे सर्व महिला समजतात. जगातील महिलांच्या महिला दिनाच्या निमित्ताने प्रत्येक भारतीयांचेच नव्हे तर प्रत्येक मानवाचे कर्तव्य आहे ते स्त्रीयांचे संरक्षण करण्याचे. कारण आपणच म्हणती की बेटी बचाव - बेटी पढाव. म्हणून प्रत्येकाने स्त्रीयांच्या कर्तृत्वाला दाद देवून आपण सर्वानी स्त्रीयांचा आदर केला तरच जागतिक महिला दिन साजरा केलाचा आनंद व्यक्त करुन ती उत्साहात साजरा झाल्याचे समाधान मिळेल !

****

# बाबुरावजी घोलप महाविद्यालयाचे वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ व स्नेहसंमेलन संपन्न

**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे** - पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे सांगवी येथील बाबुरावजी घोलप महाविद्यालयाचे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ व स्नेहसंमेलन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सांगवी येथील निळू फुले नाट्यगृहामध्ये मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणामध्ये संपन्न झाले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र - कुलगुरू डॉ. पराग काळकर व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सदस्या व महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. संगीता जगताप यांच्या हस्ते या समारंभाचे उद्घाटन झाले. याप्रसंगी महाराष्ट्र केसरी मा. पृथ्वीराज मोहोळ व प्रसिद्ध सिने अभिनेत्री स्वराज्य रक्षक संभाजी फेम - राणू अक्का अश्विनी महांगडे यांची उपस्थिती आकर्षणाचा केंद्रबिंदू होती. यावेळी महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. वंदना पिंपळे, महाविद्यालय विकास समिती सदस्य डॉ. चंद्रकला हासे, प्रा. विजय घारे, डॉ. अर्जुन डोके, सांस्कृतिक विभाग समन्वयक डॉ. सतीश एकार, शारीरिक शिक्षण संचालिका डॉ. विद्या पठारे, वरिष्ठ लिपिक अनुरिता गायकवाड, विद्यार्थी क्रीडा प्रतिनिधी लीना आडे, विद्यार्थी सांस्कृतिक प्रतिनिधी शिवम नटगिरी यांची प्रमुख उपस्थिती होती.





सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र - कुलगुरू डॉ. पराग काळकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत विद्यार्थ्यांच्या परिपूर्ण व्यक्तीमत्व विकासासाठी बाबुरावजी घोलप महाविद्यालय करत असलेल्या कार्याबद्दल महाविद्यालयाचे कौतुक करत या पारितोषिक वितरण समारंभ व स्नेहसंमेलनामध्ये आपल्या कौशल्याची चुणूक दाखवणाऱ्या विद्यार्थ्यांना शाबासकीची थाप दिली. त्याचबरोबर महाराष्ट्र केसरी मा. पृथ्वीराज मोहोळ व प्रसिद्ध सिने अभिनेत्री स्वराज्य रक्षक संभाजी फेम - राणू अक्का अश्विनी महांगडे यांनी विद्यार्थ्यांना आपले ध्येय गाठण्यासाठी कष्ट करण्याशिवाय पर्याय नसल्याचे सांगत विद्यार्थ्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. विशेषतः सिने अभिनेत्री अश्विनी महांगडे यांनी सादर केलेल्या शिव गर्जनेने चैतन्यमय वातावरण निर्माण केले. आपल्या अध्यक्षीय मनोगतात प्राचार्या डॉ. संगीता जगताप यांनी सदर वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ आयोजित करण्यामागील उद्देश सविस्तर स्पष्ट करत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये शैक्षणिक, क्रीडा, संशोधन, प्रशासकिय कामे व सांस्कृतिक या विविध क्षेत्रात यश संपादन केलेल्या महाविद्यालयातील विद्यार्थी, प्रशासकिय सेवक या सर्वांचे अभिनंदन व कौतुक करण्यासाठी या समारंभाचे नियोजन असल्याचे स्पष्ट करत चालू शैक्षणिक वर्षामध्ये झालेल्या कार्याचा आढावा घेतला.

या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रामध्ये राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल महाविद्यालयाच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच महाविद्यालयातील प्राध्यापकांनी विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चर्चासत्र, कार्यशाळा यामध्ये सादर केलेल्या शोधनिबंधांचे पुस्तक स्वरूपामध्ये प्रकाशन करण्यात आले. यावेळी तेजल महाजन हिला स्टुडन्ट ऑफ द इयर या पुरस्काराने गौरवण्यात आले. तसेच बेस्ट टीचर ऑफ द इयर म्हणून पुरूष गटातून डॉ. सतीश एकार तर महिला गटातून प्रा. अनुपमा कदम यांची निवड झाली. त्याचबरोबर बेस्ट नॉन टीचींग ऑफ द इयर या पुरस्काराने पुरुष गटातून निलेश शिंदे व रामदास चिंचवडे तर महिला गटातून नीलम जगताप - रणपिसे यांचा सन्मान करण्यात आला. स्नेहसंमेलनामध्ये महाविद्यालयातील विविध विभागातील विद्यार्थ्यांनी पोवाडा, रॅप साँग, डान्स, मिमिक्री अशा विविध प्रकारामध्ये बहारदार अभिनयाचे सादरीकरण करत उपस्थितांची मने जिंकली. या समारंभाचे प्रास्ताविक डॉ. विद्या पाठारे तर सूत्रसंचालन डॉ. अमृता इनामदार, डॉ. सुवर्णा खोडदे, डॉ. शिवाजी शेळके, आभार प्रदर्शन डॉ. वंदना पिंपळे तर संपूर्ण छायांकन प्रणित पावले यांनी केले. यशस्वीतेसाठी प्राचार्या डॉ. संगीता जगताप यांचे काटेकोर नियोजन व वेळोवेळी केलेल्या महत्वपूर्ण सूचनेनुसार सर्व शिक्षक, प्रशासकीय सेवक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेत यशस्वी कार्यक्रम घडवून आणला.









# 'हुएं बदनाम'चा रंजक किस्सा

**ज्योतिर्मय साहित्य**

कार्यक्रम: १९७२ ला एस एस सी उत्तीर्ण झालेल्यांचा मेळावा.

स्थळ : मनमाड ( नाशिक.)

तारीख : २९ डिसेंबर २०२१

झाले असे की अस्मादिक उपरोक्त कार्यक्रमाला सपत्नीक उपस्थित होतो. मग काय गप्पांचा फड रंगला.

लहानपणापासूनच मला जुनी चित्रपट आणि गाण्याच्या छंद आहे. इयत्ता सातवीत असताना मित्रांच्या आग्रहाखातर मधल्या सुट्टीत वर्ग रिकामा असतांना एक गाणं मी गुनगुनत होतो.

**मेरी मुहब्बत पाक मुहब्बत......**

पुरब पश्चिम उत्तर दक्षिण मेरे प्यारकी सिमा......

गाण्याच्या या कडव्या दरम्यान योगायोगाने सिमा मराठे या नावाची मुलगी वर्गात शिरली आणि गहजब झाला. माझ्या मनात अर्थातच काही काळंबैर नव्हते. त्या काळी मुलींशी बोलणेच मोठ्या जिकिरीचं असायचं.

मधल्या सुट्टीनंतर नियमित वर्ग सुरू झाला.



सहस्त्रबुद्धे सरांचा मराठी विषयाचा तास होता.

सर आले मला जवळ बोलावले आणि फाडकनं थोबाडीत लगावली. वर्गात कुणालाही काहीही कळले नाही. मी ही शांतपणे आपल्या जागेवर येऊन बसलो. शिक्षकांचा मार त्या काळी सगळ्यांच्या अंगवळणी पडणारा तो काळ होता. हा किस्सा सांगताच महफिलमध्ये हास्याचे फवारे उडविले विशेष म्हणजे आमच्या बेगम यांनी सुध्दा दिलखुलास दाद दिली. विशेष म्हणजे सदरील मुलगी दहावीत असताना दुसऱ्या सत्रात कुठे तरी बदलून गेल्यामुळे कार्यक्रमात नव्हती.





हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559